04.03.2020 प्रभात:मुरली ओम शांती बापदादा मधुबन

**गोड मुलांनो, आता तुमचे जीवन खुप खुप अमुल्य आहे कारण तुम्ही हद मधून निघून बेहदमध्ये आले. तुम्ही जाणता की, आम्हीच जगाचे कल्याण करणारे आहोत...!!**

**प्रश्नः-** बाबाच्या वारश्याचा अधिकार कोणत्या पुरुषार्थाने प्राप्त होतो?

**उत्तरः-** सदैव भाऊ-भाऊची दृष्टी ठैवा ज्यामुळे स्त्री पुरुषाचे भान निघून जाईल. तेव्हा वडिलांचा संपूर्ण वारसा प्राप्त होईल. परंतू स्त्री-पुरुषाचे भान किंवा ही दृष्टी बदलणे खुप कठीण आहे. या करीता आत्म अभिमानी बनण्याचा प्रयत्न करावा जेव्हा बाबांचे मुलं बनणार तेव्हाच वारसा मिळेल. एक बाबाच्या आठवणींनेच सतोप्रधान बनणारे जीवनमुक्तीचा वारसा प्राप्त करतात.

**गीतः-** शेवटी तो दिवस आला आज, ज्या दिवसाची आम्ही वाट पाहत होतो...

ओम शांती! मुले हे जाणतात की ओम म्हणजे मी आत्मा माझे शरीर, आता तुम्ही ह्या सृष्टी रुपी ड्रामा आणि हे जाणणारे ईश्वर पित्याला जाणतात कारण सृष्टी चक्राला जाणणरे याना रचना म्हणतात. रचना आणि रचयिता ला दुसरे कोणीच जाणत नाही, जरी खुप शिकलेले, मोठ मोठे विद्वान पंडित असो. त्यांना आपली स्वत:ची घमेंड असते ना? परंतू त्यांना हे माहित नाही असे म्हणतात ज्ञान-भक्ती-वैराग्य, ह्या तीन गोष्टींचा अर्थ ही जाणता नाही. सन्यासी लोकांना आपल्या घराचा वैराग्य येतो. त्यांनाही श्रेष्ठ-कनिष्ठची ईर्ष्या असते. हे उंच (श्रेष्ठ) कुल आहे, हे मध्यम कुल आहे. ह्याची चर्चा त्यांच्यात खुप होते. कुंभ मेळ्यात ही ह्यावरुन बरेच वाद होतात. की पहिले कोणाची स्वारी निघेल. ह्यावर खुप भांडतात, पोलीस येऊन सोडवितात, तर हा पण देह अभिमान आहे ना. दुनियेत जे जे लोक आहेत सर्व देह अभिमानी आहे. तुम्हाला तर आता आत्म अभिमानी बनायचे आहे. बाबा म्हणतात देह अभिमान सोडा. स्वत:ला आत्मा समजा. आत्माच पतित बनली आहे. आत्माच सतोप्रधान-तमोप्रधान बनते. जशी आत्मा तसे शरीर मिळते. कृष्णाची आत्मा सुंदर आहे तर त्यांचे शरीर पण सुंदर आहे. त्यांच्या शरीराचे खुप आकर्षण आहे. पवित्र आत्माच आकर्षित करते. सगळे म्हणतात. छोट्या लहान मुलांची आत्मा महात्मा समान असते. महात्मा तरी जीवनाचा अनुभव करुन मग विकार सोडतात, घृणा येते. मुले तर पवित्र असतात त्यांना महात्मा म्हणतात. तर बाबा समजावतात की, सन्यासी लोकांना हा विनाश थोपवाला आहे. जसे घर जुने झाले असेल तर मरम्मत करतात. तशी सन्याशी मरम्मत करतात. पवित्र राहिल्यामुळे भारत आजही टिकून आहे. भारतासारख्या पवित्र आणि धनवान खंड दुसरा कोणता होऊच शकत नाही. आता बाप रचना आणि रचतेचे आदि मध्ये अंताची स्मृती देतात. कारण बाप बापही आहे, शिक्षक आहे आणि गुरुही आहे. श्रीमद भगवत गीतेमध्ये श्रीकृष्ण भगवानूवाच लिहून ठेवले आहे. त्याला कधी बाबा म्हटले नाही किंवा पतीत पावन म्हणता काय? जेव्हा मनुष्य पतित पावन म्हणतात तेव्हा कृष्णाला नाही तर ईश्वराला आठवण करतात मग तरीही म्हणतात पतित पावन सिताराम, रघुपती राघव राजाराम किती संभ्रमावस्था आहे. बाप म्हणतात मी तुम्हा मुलांना यथार्थ वेद शास्त्राचा सार येऊन सांगत आहे. पहली पहली गोष्ट समजावतात की, तुम्ही आत्मा-आत्मा भाऊ-भाऊ आहे. आत्मा समजून पित्याची आठवण केली तर पतितापासून पावन बनाल. ब्रह्माच्या नात्याने कुमार-कुमारी भाई-बहिण झाले व एवढे ही समजत नाही तो आमचा पिता आहे, तर आपण सर्व आपसातभाऊ भाऊ झालो ना, मग सर्वव्यापी कसे म्हणू शकतो? वारसा तर मुलांनाच मिळेल पित्याला नाही. पित्याकडून मुलांना वारसा मिळतो. ब्रह्मा पण ईश्वराचा मुलगा आहे ना? त्यांना पण वारसा मिळतो तुम्ही नातू पंतू. तुम्हाला पण अधिकार आहे. तेव्हा आपल्या नात्याने सर्व मुलं आहे. शरीराच्या नात्याने मग भाऊ-बहिण आहे. आणखी कोणतेच नाते नाही. नेहमी भाऊ-भाऊची दृष्टी राहायला पाहिजे. तेव्हा स्त्री-पुरुषाचे भान निघून जाईल. जेव्हा स्त्री-पुरुष दोन्ही पण म्हणतात. गॉड फादर तर भाऊ बहिण ठरले ना? भाऊ बहिण तेव्हाच बनतात जेव्हा संगमयुगात येऊन रचना रचतात. परंतू स्त्री-पुरुषाची दृष्टी (भान) महत प्रयासाने जाते. बाबा म्हणतात देही अभिमानी बना ईश्वराची मुले बनणार तेव्हाच वारसा मिळेल. माझी आठवण केली, तेव्हाच वारसा मिळेल. सतोप्रधान बनण्याशिवाय वापस मुक्ती-जीवनमुक्ती धाममध्ये जावूच शकणार नाही. ही युक्ती सन्यासी कधीच सांगणार नाहीत. ते कधीच असे म्हणणारनाही की,स्वत:ला आत्मा समजून पित्याची आठवण करा. ईश्वरालाच

म्हणतात की, परमपिता परमआत्मा, सुप्रीम आत्मा. आत्मा तर सर्वांनाचा म्हणतात परंतू परमआत्मा त्यालाच म्हणतात. बाबा म्हणतात, मुलांनो मी आलो तुमच्याजवळ आम्हाला बोलण्यासाठी मुख तर लागले ना? आजकाल पहा जिथे-तिथे गऊमुख ठेवतात मग म्हणतात, गौमुखातून अमृत निघाले. पाण्याची तर गोष्टच नाही ना? ही गौमाता पण आहे. बाबा यांच्यात प्रवेश करतात. बाबांनी ह्याच्याद्वारे तुम्हाला आपले बनलेले आहे. त्यांच्या मुखातून ज्ञान निघते त्यांनी तर दगडाचे मुख बनवून तेथून पाणी काढले, ती भक्ती झाली, यथार्थ गोष्टी तुम्हाला माहित आहे. भिष्म पितामह सारख्या लोकांना तुम्ही ब्रह्मा कुमारीनी बाण मारले. तुम्ही तर ब्रह्मा कुमार ब्रह्माकुमारी आहात. तुम्ही कुमारी कोणाची? कुमारी आणि अधरकुमारी दोघांचे मंदीर आहेत. प्रॅक्टीकल मध्ये ते तुमच्याच आठवणीचे मंदीर आहे. आता तुम्ही बसून सांगतात, तेव्हा देहीक दृष्टी जात नाही. नाही तर खुप मोठी सजा मिळेल. देह भानात आल्याने आपण हे विसरुन आलो की, आम्ही ब्रह्माकुमार आहोत, नाही तर विकारी दृष्टी जाणार नाही. परंतू असुरी संप्रदायाचे लोक विकाराशिवाय राहू शकत नाही म्हणून विघ्न टाकतात. आता ब्रह्माकुमार कुमारींना बापाकडून वारसा मिळत आहे. पित्याच्या श्रीमंतावर चालणे, पवित्र बनणे, हा विकारी मृत्यू लोकातील अंतिम जन्म आहे. हे कोणी जाणत नाही. अमरलोकांत कोणी विकारी राहत नाही, त्यांना म्हणतात. संपूर्ण निर्विकारी, येथे मग आहे संपूर्ण विकारी. गायन पण करतात की, देवता संपूर्ण निर्विकारी आहेत, आम्ही पतित विकारी आहोत. संपूर्ण निर्विकारीची पुजा करतात बामनी, बाबांनी समजावले की, तुम्ही भारतवासी पुज्य पासून पुजारी बनतात. सध्या भक्तीचा प्रभाव जास्त आहे. भक्त भगवानाची आठवण करतात की येऊन भक्तीचे आम्हाला फळ द्या. भक्तीमध्ये किती हाल झाले, बाबानी सांगितले मुख्य आहे 4 धर्म, शास्त्र, एक आहे दैवीघराणे त्यात ब्राह्मण, देवता ---- येतात. बाप ब्राह्मण धर्माची स्थापना करतात ब्रह्मणाची शेंडी आहे. संगमयुगाची तुम्ही ब्राह्मण आता पुरुषोत्तम बनत आहात. नंतर देवता बनतील. ते ब्राह्मण पण विकारी आहेत. ते पण ह्या ब्राह्मणांना नमस्कार करतात. ब्राह्मण देवी देवता नम: म्हणतात कारण ब्राह्मण ब्राह्मणी मुलं आहेत. आम्ही तर ब्रह्माची मुले आहोत. आता तुम्ही ब्रह्माची संतान बनतात. तुम्हाला तर सर्व नमस्कार करतील. तुम्ही मग देवी देवता बनणार. आता तुम्ही ब्रह्मा कुमार कुमारी आहात, नंतर बनणार दैवी कुमार कुमारी. सध्या तुमचे जीवन खुप मौल्यवान आहे, कारण तुमचे जगतआत्मा हे गायन आहे. तुम्ही जाणता की, आपण जगाचे कल्याण करणारे आहेत. तेव्हा तुम्ही प्रत्येक जण जगत माता जगतपिता ठरले. ह्या नर्कात सर्व जण खुप दु:खी आहेत. आम्ही त्याची सेवा करण्यासाठी आलो. आम्ही त्यांना स्वर्गाचा वारसा देणार. तुम्ही सेना आहात. ह्याला युध्द भुमी ही म्हणतात यादव, पांडव कौरव तिन्ही एकत्र राहतात. भाऊ-भाऊ आहेत ना. आता तुमचे युध्द भाऊ बहिणींसोबत नाही, तर रावणासोबत आहे. मनुष्यापासून देवता बनण्यासाठी तुम्ही भाऊ बहिणींना ज्ञान देत आहोत. तेव्हा बाबा समजून सांगत आहेत की, देहासहित देहाच्या सर्व संबंध विसरायचे आहे. ही जुनी दुनिया आहे. नदीमध्ये पाणी खुप राहते. धान्य ही खुप मिळते. येथे तर करोडो मनुष्य आहेत. तेथे सर्व धरणीवर 9-10 लाख लोक राहतात. आणखी कोणताच खंड नसतो. तुम्हाला कोठेही जाण्याची गरज नाही, तेथे नेहमी चांगले हवामान असते. 5 तत्व ही काही त्रास देत नाही. आर्डरमध्ये राहतात. दु:खाचे नाव नाही, तो आहेच स्वर्ग. आता आहे नर्क. नर्क सुरु होतो, मध्यांतर जेव्हा होतो. देवता वाम मार्गी लागतात. तेथून रावण राज सुरु होते. तुम्ही समजले आहे की, आपण दुहेरी मुकूटधारी पुज्य बनतो व नंतर ऐकेरी मुकूटधारी बनतो. हीसतयुगात पवित्रताची निशाणी आहे. देवता नेहमी पवित्र असतात येथे पवित्र कोणीच नाही. जन्म नेहमी विकारातून होतो. कारण ह्याला भ्रष्टाचारी दुनिया म्हणतात. सतयुग आहेश्रेष्ठाचारी दुनिया. विकार म्हणजे भ्रष्टाचारी. मुलांना माहित आहे सतयुगात पवित्र मार्ग होता. आता अपवित्र झाले आहे. आता पवित्र दुनिया बनते आहे. सृष्टी चक्र फिरते आहे. परमपिता परमात्माला पतित पावन म्हणतात. मनुष्य म्हणतात भगवान प्रेरणा देतात. आता प्रेरणा म्हणजे विचार यात प्रेरणेची गोष्टच नाही, ते स्वत: म्हणतात की, मला शरीरांचा आधार घ्यावा लागतो. मी मुखाशिवाय कसे ज्ञान देवू. प्रेरणे कुठे ज्ञान देता येते का? भगवान प्रेरणेचे काही करीत नाही बाप तर मुलांना शिकवितो. प्रेरणेद्वारे थोडेच शिकविले जाते? परमात्मा शिवाय सृष्टीच्या आदि मध्य अंताचे ज्ञान कोणीच सांगू शकत नाही. ईश्वराला कोणी जाणत नाही, कोणी म्हणतात परमात्मा ज्योर्तिलिंग आहे. कोणी म्हणतात परमात्म अखंड ज्योती आहे. कोणी म्हणतात ब्रह्म म्हणजे ईश्वर आहेत. तत्त्वज्ञानी ब्रह्म ज्ञानी पण आहेत ना? शास्त्रात 84 लाख योनी दाखविल्या आहेत. आता पहा84 लाख योनी जर असत्यातर कल्प किती मोठा असेल, कोणी हिशोब करुच शकत नाही. ते तर सतयुगाला लाखो वर्षाचे म्हणतात. बाप म्हणतात सृष्टी चक्रच 5 हजार वर्षाचे आहे. 84 लाख जन्मासाठी वेळ ही तेवढा लागेल ना? हे शास्त्र सगळे भक्ती मार्गाचे आहेत. बाबाम्हणतात मी येऊन सर्व शास्त्रंचे सार सांगतो ही सगळी भक्ती मार्गाची सामग्री आहे. यापासून मला प्राप्त करु शकत नाही. मी जेव्हा येतो तेव्हा सर्वांना घेऊन

जातो. मला बोलावतातच हे पतित पावन या आणि पावन बनवून पावन दुनियेत घेऊन चला. मग मला शोधण्यासाठी धक्के का खातात. किती दूर डोंगरात जातात. आजकाल तर किती मंदिर रिकामे पडले आहे. कोणीच जात नाही. आता तुम्ही मुलं परमेश्वराची बायोग्राफी जाणतात. बाप मुलांना सगळ काही देवून 60 वर्षानंतर वानप्रस्थ अवस्थेत बसतो. ही रित ही आताची आहे, सण ही आताचेच आहेत.

तुम्ही जाणतात की, आम्ही संगमयुगात उभे आहोत. रात्री नंतर दिवस येतो. आता तर घोर अंधार आहे. म्हणतात की ज्ञान सुर्य प्रयत्न अंज्ञान अंधार दूर झाला. तुम्ही बाबाला आणि सृष्टीच्या आदि मध्य अंताला जाणतात, जसे ईश्वर ज्ञानी आहेत, तसे तुम्ही पण मास्टर ज्ञानी आहोत, तुम्हा मुलांना बापांकडून वारसा मिळतो.लौकिक बापांकडून तर सिमित वारसामिळतो, ज्यापासून अल्पकालिक सुख मिळते याला सन्यासी कागविष्ठे समान सुख म्हणतात. ते हठयोगी येथे सुखासाठी पुरुषार्थ करतात. तुम्ही आहे राजयोगी, तुमचा बुध्दीयोग बाबांशी आहे. त्याचा आहे तत्त्वाशी योग, हापण ड्रामा बनलेलाआहे. अच्छा.

गोड गोड, फार फार वर्षांनी भेटलेल्या मुलांप्रती मातपिता बापदादांची प्रेमपुर्वक आठवण आणि सुप्रभात आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

**धारणेसाठी मुख्य सारांश:-**

1. पावन बनण्याकरिता आम्ही आत्मा भाऊ भाऊ, नंतर ब्रह्माचीसंतानभाऊ बहिण, हीच दृष्टी पक्की करा. आत्मा आणि शरीर दोघांना पावन बनवावे. देह अभिमान सोडावा.
2. मास्टर नॉलेज फुल बनून रचना आणि रचनेचे ज्ञान सांगून घोर अंधारापासून काढावे. नर्कवासी मनुष्याची सेवा करुन स्वर्गवासी बनवावे.

**वरदान:-** एक बाबा दुसरे न कोणीया संकल्पाद्वारे अविनाशी अमर भव

जे मुले हा दृढ संकल्प करतात की एक बाप दुसरे कोणी नाही. त्याची स्थिती स्वत: आणि सहज एकरस होते. या दृढ संकल्पानी सर्व संबंधाची अविनाशी तार जुळते. आणि त्यांना सदा अविनाशी भव अमर भव चा वरदान मिळतो. दृढ संकल्पानेच पुरुषार्थाला विशेष लिफ्ट मिळते. ज्याचा एक बाबाशी सर्व संबंध आहे. त्यांना स्वत: सर्व प्राप्ती होत जाते.

**बोधवाक्य:-** विचार करणे, बोलणे आणि कर्म करणे तिन्ही गोष्टींना एक समान बनवा त्याला म्हणतात सर्वोत्तम पुरुषार्थी.

||| ओम शांती |||

// ओम शांती //